# सीमापार

## लेखक : तृष्णा बसाक



ब्लॉक दोन मधल्या काचेच्या इमारतीतील एकोणीसाव्या मजल्यावर ते शांतपणे बसले होते. ते, म्हणजे अरा आणि रेमो. हा मजला अंड्यासारख्या आकाराच्या या काचेच्या इमारतीमध्ये थोडा खालच्या बाजूला होता. भिंतीमध्येच इन-बिल्ट अशी बसण्याची व्यवस्था होती. अगदी मध्यभागी जनकल्याण सेवा अधिकाऱ्याचं कार्यालय होतं. साउंड सिस्टीमवर मृदू आवाजात सरोद झंकारत होतं. स्वयंचलित कॉफी आणि स्नॅक्सच्या व्हेंडिंग मशीनमधून मनाला येईल ते घेऊन खाता येत होतं. बाहेर मावळती संध्याकाळ होती. हे कल्याणभवन आकाशात ढगासारखे हवेवर तरंगत होतं. तरीही काहीच छान वाटत नव्हतं. मन उदास झालं, तर मनगटावर बांधलेल्या छोट्याशा घड्याळातलं निळं बटण फक्त दाबायचं, बस. पण त्या दोघांना तेही करण्याची इच्छा होत नव्हती. त्यांच्यासारखी आणखी सहा जोडपी कपाळावर

काळजीच्या आठ्या घेऊन वाट पहात बसली होती. म्हणजे त्यांचेही आई किंवा वडील, सासू किंवा सासरे.....

‘अरा, रेमो, ब्लॉक नाईन, सेक्टर थ्री.’ पियानोसारखा सुरेल आवाज आला. टेन्शनमुळे रेमो आता आणखी बसू शकत नव्हता. त्याने दबक्या आवाजात अराला विचारले, “मांचा कोड लक्षात आहे नं ?” अराने मानेनेच त्याला हो म्हटलं.

खोलीत जाताच एका सडपातळ मुलीने पुढे येऊन हस्तांदोलन केलं. “अरा आणि रेमो? मी युहाना, काय घेणार आपण?” युहानाच्या मागच्या भिंतीतून समुद्र दिसत होता. अराला तिकडे बघताना पाहून युहाना म्हणाली, “मला समुद्र आवडतो, बदलू का?”

“नाही, ठीक आहे.”

“का, रेमोला तर जंगल आवडतं आणि तुला डोंगर.”

युहानाने बोटाने इशारा करताच उजवी भिंत घनदाट जंगलात आणि डावी भिंत डोंगरामध्ये रूपांतरित झाली.

“हे सगळं बॉडी लँग्वेज ॲक्टिव्हेटेड आहे, हो नं?”

“अगदी बरोबर.” युहानाने हसत म्हटलं. “चला, आता सांगा, तुम्ही काय म्हणताय.”

एका छोट्याशा सेंटर टेबलभोवती तीन सोफे ठेवलेले होते. टेबलावर वाफाळती कॉफी आणि चिकन पकोडे ठेवले होते. त्यांना वाटलं तर ते होम वेब मधून पण युहानाशी बोलू शकले असते. खरं तर, एके काळी नेट आणि व्हिज्युअल मिडीयामुळे एडीडीएस (ADDS-

अटेन्शन डेफिसीट डिसऑर्डर सिंड्रोम) नावाचा एक धोकादायक आजार सगळीकडे पसरला होता. त्यामुळे अगदी एकटं राहायला आवडणं, लठ्ठपणा वगैरे समस्यांनी भयानक रूप धारण केलं होतं. त्यामुळे आता कारण नसताना लोक नेटचा उपयोग करतच नव्हते. सरकारही लोकांमध्ये प्रत्यक्ष भेटीगाठी होण्यावर भर देत होतं. अराचे आजोबा सुद्धा याच एडीडीएस आजाराला बळी पडले होते.

"या १४ सप्टेंबरला तर रोमानी साठ वर्षांची होईल?"

"हो." अरा आणि रेमो एकदम म्हणाले. रेमोचा स्वर थोडा कापरा होता का? परंतु हा सरकारी नियम त्यांना लहानपणापासूनच माहीत आहे. तरी, काहीही असो, आई आहे नं!

"तुम्ही दोघं तयार आहात ना? नाहीतर अजूनही सहा महिन्यांपेक्षा जास्त वेळ आहे. आमचा स्पेशल अॅडॉप्शनचा दोन महिन्यांचा कोर्स करू शकता तुम्ही, आठवड्यात तीन दिवस."

"अच्छा, कधी कधी एक्स्टेन्शन पण होतं ना?"

"डोंट बी इमोशनल रेमो. हजारो वर्षांपूर्वी या देशामध्ये वानप्रस्थाश्रम सारखी पद्धत होती, माहीत आहे ना तुला. आपली 'सीमापार' ही पण तशीच प्रथा आहे असं म्हणू शकतोस. विचार कर जरा, दोन-तीनशे वर्षांपूर्वी पृथ्वीवर वृद्धाश्रमासारखे निष्ठुर प्रकार असायचे. त्याच्यापेक्षा सीमापार तर शंभर पटींनी चांगलं आहे. आणि, यु नो, आपण जे काही केलंय, ते आपल्या येणाऱ्या पिढीचा विचार करूनच केलं आहे. त्यांना जागा हवी म्हणून तर जुन्या पिढीला जावं लागणार आहे. एक दिवस आपणही असेच...."

हे सगळं सहन न झाल्यामुळे युहानाचं बोलणं पूर्ण व्हायच्या आधीच अरा म्हणाली, “या पुढच्या पिढीसाठीच तर प्रश्न आहे. चिंकारा आपल्या आजीसाठी इतकी ऑब्सेस्ड आहे, की रोमानी गेल्यावर कदाचित तिला आम्ही जिवंत ठेवू शकणार नाही.” अराला पुढे बोलवेना. रेमो अराचे हात हलकेच दाबून म्हणाला, “खरंच युहाना, चिंकाराचा विचार करून



करून आमची तर रात्रीची झोपच उडाली आहे. आमची मुलगी इतकी छोटी आहे, अजून पाच वर्षांचीही नाहीये ती. आणि ती बारा वर्षांची होण्याआधी कोणता ॲडॉप्शनचा कोर्सही नाही करू शकत आम्ही.”

युहानाच्या डोळ्यांतली तेजस्वी शलाका विझल्यासारखी झाली. “पण आम्ही काहीच करू शकत नाही रेमो. तुम्हाला माहीतच आहे, आम्ही फक्त विशिष्ट नागरिकांनाच एक्स्टेन्शन देऊ शकतो. साहित्यिकांना, वैज्ञानिकांना; तेही ज्युरींच्या बोर्डाने परवानगी दिली, तरच. तसं तर, मला कबूल केलं पाहिजे, की अजूनपर्यंत तरी आम्ही देशातून भ्रष्टाचाराचं उच्चाटन करू शकलेलो नाही. त्यामुळे सत्ताधारी पार्टीच्या छत्रछायेत राहणारे बेकायदेशीर मार्गाने खूप फायदे घेत आहेत. खरं सांगायचं तर माझ्या हातात काहीच नाहीये. शिवाय डेटा असं दाखवतोय की रोमानीचं काही खास असं सामाजिक देणंही नाही आहे.”

रेमोच्या मस्तकात एका मागोमाग एक चित्रं फिरतायत. शाळा सुटल्यावर शाळेच्या फाटकात उभी मां, ताप आला असताना उशाशी बसलेली मां, विमान अपघातात बाबा गेल्यानंतर अरित्रकाकांचा लग्नाचा प्रस्ताव धुडकावणारी मां, चिंकाराला बागेतून घरी घेऊन येणारी मां, आणि इथे डेटा दाखवतोय, की रोमानीचं काही खास असं सामाजिक देणं नाही आहे.

“एक्सट्रीमली सॉरी, तुम्हाला दोघांना चिंकाराला समजवावं लागेल. प्रत्येक मुलाला जुळवून घ्यावंच लागतं.”

“पण ती तर...” अरा काही म्हणणार, त्याच्या आधीच रेमो म्हणाला, “ठीक आहे, चल निघू आपण.”

मग तो अराचा हात धरून ओढत तिला पटकन खोलीबाहेर घेऊन आला. त्याच्या डोक्यात संतापाचा कल्लोळ उठला होता.

***

थोड्या वेळापूर्वीच अरा ऑफिसमधून परतली होती. स्नान वगैरे आटोपून बैठकीच्या खोलीत सोफ्यावर बसून एका मासिकाची पानं ती उलटत होती. असं ऐकलं होतं, की तिच्या आजीने तिच्या लहानपणी कोणतच पुस्तक वाचलं नव्हतं. त्या दिवसांमध्ये लोकांमध्ये इलेक्ट्रॉनिक माध्यमांची इतकी नशा चढलेली होती, की पुस्तकं छापणं जवळजवळ बंद पडल्यात जमा होतं. तसं बघितलं तर आजकाल ढिगांनी वर्तमानपत्रं आणि मासिकं छापली जात आहेत. पण आजकाल लोक नवीन कथा किंवा कविता लिहीतच नाहीत. सगळी

मासिकं रिप्रिंट करूनच आपली पानं भरत असतात. अरा अस्वस्थपणे पानं उलटत होती. एकाएकी तिची नजर एका विशेष लेखावर खिळली. सुमारे दोनशे वर्षं जुन्या कोणत्या तरी लेखाचं पुनर्मुद्रण. माणसाचं क्लोन तयार करायला हवं की नको, यावरच लेख होता.

“काय मूर्खासारखं लिहिलंय.” तिने मासिक ठेवून दिलं. कधीतरी ह्युमन क्लोनिंग इतकं बिनदिक्कतपणे होत होतं, की खूप प्रश्न उभे राहिले होते. त्यामुळे मागच्या शतकामध्ये एक कडक कायदा करून ह्युमन क्लोनिंग वर बंदी घातली गेली होती.

रेमोला परत यायला आज रात्र होणार होती. खिडकीतून बाहेर पाहिल्यावर अरा थोडी चकित झाली. पाऊस पडत होता. ऑगस्ट महिन्यात पाऊस तर पडणारच ना. पण, व्हेदर रिपोर्ट गॅजेट बंद पडलंय की काय या लोकांचं? नाही, फक्त त्यांच्या लॉनमध्येच नाही, तर पूर्ण ब्लॉकमध्येच पाऊस पडत होता. लाल रंगाचं सिक्युरिटी चेक पोस्ट, पीच, मेपलची झाडं, सगळं भिजत होतं. ब्लॉकमधल्या सगळ्यांची गॅजेट बिघडली की काय? ओ हो, आज तर शनिवार आहे. देशात कवींची संख्या खूपच कमी झाल्यामुळे दोन वर्षांपूर्वी, मुख्य सांस्कृतिक सल्लागारांनी एक ‘रेन बिल’ पास केलं होतं. त्यामुळे महिन्यात चार दिवस पाऊस सहन करावाच लागणार आहे. असं म्हणतात, की पावसाच्या रिमझिमीमुळे कविता लिहिण्याची उर्मी जागी होते. माहीत नाही बाबा, दिवसभराच्या पावसानंतरही अराकडून एक शब्दही लिहिला जाणार नाही.

खरं तर, अरा एक अक्षरही लिहू शकत नव्हती कारण तिला संपूर्ण ट्रेनिंग ‘व्हर्बल आणि पिक्टोरिअल कम्युनिकेशन’ द्वारे दिलं गेलं होतं.

तिच्या बागेमध्ये एक मोठ्ठं झाड होतं, काटेसावरीचं. त्याच्या खाली पांढऱ्या बाकावर,



पावसात भिजत चिंकारा रोमानीला घट्ट मिठी मारून गोष्ट ऐकत बसली होती. अरा भीतीने थरारली. चिंकाराला तर कोणताच आजार होणार नव्हता. पण रोमानी? आणि फक्त महिन्याभरातच तिला सीमापार पाठवावं लागणार होतं. ऐन वेळेला ती आजारी पडली तर? मानवाधिकार कमिशनचे लोक आणि पत्रकार दंडुके घेऊन धावत येतील. अराच्या ऑफिसमध्ये तिला एक मोठं प्रमोशन मिळण्याची शक्यता होती; सगळं रद्द होईल. आणि, जर त्या लोकांना समजलं, की चिंकारासाठी पावसात भिजल्यामुळे रोमानी आजारी पडली आहे, तर काय होईल अन काय नाही; विचार करूनच अरा भीतीने थरथरली. जरी कोणाला काही माहिती नाहीये, तरीही अरा आणि रेमो नेहमीच भीतीच्या छायेत असतात.

माणसाने किती प्रगती केली आहे, तरीही मनाने इतका प्रिमिटीव्ह - कोणत्याही परिस्थितीमध्ये हे स्वीकारू शकत नाहीये. रेमोने मोठ्या प्रेमाने लेकीचं नाव ठेवलं ‘चिंकारा’, ती खरंच एखाद्या हरिणीसारखी उड्या मारत असते. तिच्या डोळ्यांत पाहताच अरा आपली सगळी दु:खं विसरून जाते.

"उदास वाटल्यावर तिच्या डोळ्यांमध्ये बघा.", जयव्रत म्हणाला होता. तेव्हा डोळे-बिळे काही नाही, अरा कुठल्या दुसऱ्या गोष्टीवरूनच टेन्शनमध्ये होती. "तिच्या बुद्धीची लेव्हल थोडी कमी, म्हणजे आमच्यासारखीच ठेवलीय नं? नाहीतर आम्हाला अडचणीचं होईल."

"काळजी करू नका. त्या लोकांच्या अपेक्षेपेक्षा ती थोडीशी जास्त भावूक आणि कमी बुद्धीची आहे."

"काय करताय तुम्ही दोघी तिथे? आत या." अराने खिडकीतून हाकारले.

रोमानीचा हात धरून चिंकारा आत येताना पाहून अरा अस्वस्थ झाली. चिंकारा इतकी प्रेमळ! सगळ्यांना जर समजलं, की चिंकारा इतकी भावनाशील आहे, तर कदाचित तो इतका मोठा मुद्दा बनेल की सरकारच कोसळेल. माणसाचा शेवटचं गर्वस्थानही हिरावून घेतलं जातंय, या गोष्टीवरून विरोधी पार्टी गोंधळ घालेल. असं ऐकलं आहे, की आधीच्या काळी गोऱ्या कातडीचे लोक काळ्या लोकांशी वाईट वागत असत. आता तर दोनच वर्ग आमनेसामने उभे आहेत, मानव आणि यंत्रमानव.

रोमानी तिचे आणि चिंकाराचे भिजलेले कपडे बदलून खोलीत आली. बघून पत्ताच लागत नाहीये, की त्यांच्याजवळ फक्त एक महिन्याचीच मुदत बाकी आहे. सीमापारवरून कोणीच परत येत नाही. एक दिवस रेमो आणि अराला सुद्धा तिथे जावं लागणार आहे. चिंकारा- तिच्या मस्तकापासून पायापर्यंत एक थंड लहर सळसळत गेली. आणि तेव्हाच, 'आई' म्हणत चिंकारा धावत तिच्या कुशीत शिरली. "बाबांना परत यायला रात्र होईल का?"

“हो गं. पण तू इतका वेळ जागू नकोस. थोड्या वेळाने जेवण झालं की झोपवते मी तुला.”

“ना..ही. आजी भरवेल मला.”

“आजीला बरं नाहीये सोना.”

“ना...ही.”

असहाय्य नजरेने अराने रोमानीकडे पाहिलं. त्या दोघींचे डोळे या सांजवेळेच्या आकाशासारखे पाणावले होते. सगळ्या जगात फक्त चारच लोकांना ही गोष्ट माहीत आहे - अरा, रेमो, रोमानी आणि जयव्रत. रोमानी हळूहळू चिंकाराला खेळण्यांच्या खोलीत घेऊन गेली. तेवढ्यात फोनची घंटा वाजली. “रेमोचाच फोन असणार. यायला अजून उशीर होणार आहे की काय? हॅलो.”



“मी युहाना. अरा बोलते आहेस ना?”

अराने थोडं अडखळत म्हटलं, “हो, पण काय झालंय?”

अचानक आलेल्या या फोनचं प्रयोजन तिला समजेना. जेव्हा दुसरं काही होऊच शकत नाही.....

“उद्या एकदा येऊ शकशील, साधारण संध्याकाळी चारच्या सुमारास?”

दु:खाने आणि ताणामुळे तिचं डोकं भणाणून गेलं होतं. “ठीक आहे.”, मोठ्या मुश्किलीने ती म्हणाली.

***

तीच खोली, तीच कॉफी आणि तेच चिकन पकोडे, भिंतीवर तसाच निळा समुद्र, युहानाच्या चेहऱ्यावरचं तेच हास्य, काही महिन्यांपूर्वीच्या संध्याकाळी सुद्धा असंच हास्य होतं.

“बसा. खरं तर तुमच्यासारख्या अनेक केस आमच्याकडे आल्या आहेत. कदाचित लवकरच यावर एक उच्चस्तरीय बैठक होईल. पण हा सगळा एक-दोन दिवसांचा मामला नाहीये. खूप वर्षही लागू शकतात.”

अरा आणि रेमोने एकमेकांकडे बघितलं. जर काही करूच शकत नसाल, तर असं बोलावण्याचं कारणच काय. त्यांची मनस्थिती ओळखून युहाना म्हणाली, “ माझ्या डोक्यात एक दुसरा उपाय आलाय.”

“एक्सटेन्शन?” रेमोच्या डोळयांत आशेची किरणं चमकली.

“ऊँहूँ, रिप्लेसमेंट.”

"रिप्लेसमेंट!"

"हो. हुबेहूब रोमानीसारखा एक ह्यूमनॉइड बनवणे. तुमची मुलगी ओळखूच शकणार नाही, की जिला ती आजी म्हणून गळामिठी मारते आहे, ती तिची हाडामांसाची आजी नसून एक ह्यूमनॉइड आहे."

"नाही-नाही," रेमोच्या स्वरात व्याकुळता होती. "चिंकारा नक्की ओळखेल."

युहानाच्या कपाळावरच्या आठ्या बघून अरा गडबडीने म्हणाली, "खरं म्हणजे चिंकारा खूपच संवेदनशील आहे. तो फॅन्सी ड्रेस पार्टीचा प्रसंग आठवतोय? तू कशा विचित्र ड्रेसमध्ये आली होतीस, पण चिंकाराने ओळखलं होतं."

"नाही - नाही, अशक्य. तुमची मुलगी कितीही हुशार का असेना, माणूस आणि ह्यूमनॉइड मधला फरक ओळखणे तिला अशक्य आहे. मोठे लोकसुद्धा ओळखू शकत नाहीत तर. नाहीतर मग संविधानामध्ये विशेष दुरुस्ती करून ह्यूमनॉइड्सना सगळे नागरिकांचे अधिकार कसे दिले गेले? विचार कर जरा."

"आमच्या मुलीला सगळं काही शक्य आहे, युहाना. कारण ती स्वत: एक ह्यूमनॉइड आहे. अरामध्ये काही समस्या असल्यामुळे चार वर्षे, सात महिन्यांपूर्वी तिला आम्ही एका वैज्ञानिक मित्राच्या लॅबमधून घेऊन आलो आहोत."

वेडा तर नाही झाला रेमो? अराच्या डोळ्यांसमोर सगळं जग हादरलं जणू. भिंतीवरच्या लाटा ऑक्टोपसच्या सोंडांप्रमाणे वाटत होत्या. "ह्यूमनॉइड?" द्वेषाने युहानाचा सुंदर चेहरा

आक्रसला. “आपण ह्यूमनॉइड आपल्या गरजा पूर्ण करण्यासाठी तयार केलेत, त्यांच्या बरोबर सामाजिक बंधनं जोडण्यासाठी नाहीत, तुम्हाला दोघांना माहीत आहे नं हे.”

“नाही युहाना, या जगाला राहण्यायोग्य करण्यासाठी आपण ह्यूमनॉइड तयार केले आहेत. त्या काळात माणूस सगळी माणुसकी विसरला होता, त्या विनाशापासून वाचण्यासाठीच तर माणसाचे सगळे सद्गुण एकत्र करून ह्यूमनॉइड तयार केला आहे.” एकाच श्वासात रेमोने इतकं सगळं सांगून टाकलं.

“कूल डाऊन रेमो,” युहानाचं तेच हास्य परत तिच्या चेहऱ्यावर दिसू लागलं होतं. “पण याच्या परिणामांबद्दल विचार केलाय का तुम्ही लोकांनी? जर ही गोष्ट उघड झाली तर....” “कोण सांगेल?”

“का, मी सांगेन? जर तुम्ही दोघांनी माझी एक अट मान्य केली नाहीत तर.”

“कोणती अट?”

“माझ्या भावाची ह्यूमनॉइडची एक फॅक्टरी आहे. तिथून तुम्हाला रोमानीचा एक ह्यूमनॉइड विकत घ्यावा लागेल. पंचेचाळीस कोटी; कॅशडाऊन.”

“आणि तू किती घेशील?” रेमो थंड स्वरात म्हणाला. “थोडे जास्त पडतील, किती तरी जणांना मॅनेज करायचं आहे.” “ऐक युहाना, मनात आणलं तर मी आईचं वय, चिंकाराचा आनंद तुझ्याकडून विकत घेऊ शकतो; पण मी नाही घेणार विकत. माझ्या छोट्याशा जगाचा चक्काचूर होईल, पण तुझ्याकडून कधीच नाही विकत घेणार.”

“ते तू ठरव रेमो. मला माझं काम करावं लागेल.”

उत्तेजित होऊन रेमो आणखी काही म्हणणार होता, पण अरा त्याच्या हाताला धरून त्याला बाहेर ओढून घेऊन गेली. खाली आल्यावर दोघांनी त्या इमारतीकडे पाहिलं. आकाशात लहरणाऱ्या एखाद्या ढगासारखं ते ‘कल्याणभवन’ आकाशात तरंगत होतं. सूर्य मावळतीला झुकला होता. त्यामुळे ढगांवर रक्ताचे शिंतोडे उडाल्यासारखं वाटत होतं.

“काय रे, जर आपण चिंकाराला त्यांच्या तावडीतून सोडवलं, तर ती एक दिवस युहाना सारखीच होईल का? रक्त-मांसाची नसेल बनलेली, आहे तर ती आपलीच आत्मजा, माणसांच्या हातांनी तयार झालेली.”

रेमो गप्पच राहिला.

*हिंदी शैक्षणिक संदर्भ अंक १५१ मधून साभार.*

§§§

---

**लेखक : तृष्णा बसाक**, आधुनिक बंगाली साहित्यातील एक उल्लेखनीय कवयित्री, कथा-कांदबरीकार, निबंधकार. सध्या पूर्णवेळ लेखिका, संपादक, अनुवादक. अनेक प्रतिष्ठित पुरस्कारांनी सन्मानित आहेत.

**अनुवाद : संजीवनी आफळे**, शैक्षणिक संदर्भ गटात कार्यरत.

***(कळीचे शब्द :- कथा, ह्यूमनॉइड, story, humonoid )***